महाराष्ट्र शासन
# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४३६,
ई-मेल-desk3@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्र. २/एनजीसी/वि.सं.ब./२०२२/७०२ दिनांक : 21 JUL 2022

## परिपत्रक

विषय : शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये विनाअनुदानित अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र व एचएमसीटी इ. पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थेतील विद्यार्थ्याचे पहिल्या वर्षानंतर पाठयक्रम / पाळी बदल, तसेच पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या वर्षानंतर संस्था बदल करण्याबाबत......

संदर्भ : शासन अधिसूचना क्र. टीईएम-२०१६/प्र.क्र.४७३(भाग-३)/तांशि ४, दि. २४.०४.२०१७

या संचालनालयाच्या अधिपत्याखालील अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र व एचएमसीटी पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे पहिल्या वर्षानंतर पाठयक्रम बदल, तसेच पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या वर्षानंतर संस्था बदल करण्यास संदर्भीन अधिसूचनेतील नियम क्र. १६ अन्वये तरतूद करण्यात आलेली आहे. सदर नियमाची प्रत (मराठी व इंग्रजी मधील) सोबत माहितीसाठी जोडली असून त्यामध्ये पाठ्यक्रम बदल व संस्था बदलासाठीची प्रमुख पात्रता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | वर्ष | विनंती | पात्रता |
|---|---|---|---|
| १ | दुसरे वर्ष | अभियांत्रिकी पदवी पाठ्यक्रम / पाळी / संस्था बदल | प्रथम व द्वितीय सत्र उत्तीर्ण किंवा उत्तीर्ण होण्यासाठी आवश्यक विषयापैकी एका विषयात अनुत्तीर्ण, पाठ्यक्रम / पाळी / संस्था बदलीस विंनती केलेल्या शाखेत संबंधित संस्थेत रिक्त जागांची उपलब्धता, तसेच विद्यापीठ बदल होत असल्यास विद्यापीठाने निर्धारीत केलेली पात्रता. |
| २ | तिसरे वर्ष | संस्था बदल | प्रथम वर्ष उत्तीर्ण, द्वितीय वर्षाच्या परीक्षेमध्ये तृतीय व चतुर्थ सत्र उत्तीर्ण किंवा उत्तीर्ण होण्यासाठी आवश्यक विषयापैकी एका विषयात अनुत्तीर्ण, संस्था बदलीस विंनती केलेल्या संस्थेतील संबंधित वर्ग शाखेत रिक्त जागांची उपलब्धता व विद्यापीठ बदल होत असल्यास विद्यापीठाने निर्धारीत केलेली पात्रता |
| ३ | चौथे वर्ष | संस्था बदल | प्रथम व द्वितीय वर्ष उत्तीर्ण, तृतीय वर्षाच्या परीक्षेमध्ये पाचवे व सहावे सत्र उत्तीर्ण किंवा उत्तीर्ण होण्यासाठी आवश्यक विषयापैकी एका विषयात अनुत्तीर्ण, पाठ्यक्रम / पाळी / संस्था बदलीस विंनती केलेल्या संस्थेतील संबंधित वर्ग शाखेत रिक्त जागांची उपलब्धता व विद्यापीठ बदल होत असल्यास विद्यापीठाने निर्धारीत केलेली पात्रता |

२. पाठ्यक्रम बदल व संस्था बदलासाठी नियमानुसार पात्र इच्छुक विद्यार्थ्यांनी त्यांचा अर्ज (अर्जाचा नमुना Annexure A ज्या शैक्षणिक संस्थेत पाठ्यक्रम बदल / संस्था बदल पाहिजे अशा शैक्षणिक संस्थेकडे खालील कागदपत्रांसह दि. ०१ सप्टेंबर, २०२२ किंवा थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र व एचएमसीटी अभ्यासक्रमाच्या रिक्त जागा जाहिर होणा-या दिनांकाच्या ७ दिवस अगोदर यापैकी जे आधी घडेल त्या दिनांकापर्यंत सादर करावा. सदर दिनांकानंतर तसेच अपुर्ण अर्ज किंवा आवश्यक प्रमाणपत्र / कागदपत्रांविना सादर केलेले अर्जांबाबत काहीही न कळविता असे अर्ज दप्तरी दाखल तथा नस्तीबध्द करण्यात येतील याची नोद घ्यावी.

क) संस्था बदलासाठीचा अर्ज (सोबत जोडलेल्या नमुन्यात)

ख) सध्या शिक्षण घेत असलेल्या संस्थेचे ना-हरकत प्रमाणपत्र

ग) बदलीने प्रवेश देणा-या संस्थेचे ना-हरकत प्रमाणपत्र

घ) ज्या वर्षासाठी (दुसरे, तिसरे, चौथे) संस्था बदलासाठी विनंती केली आहे, त्या वर्षापूर्वीच्या सर्व वर्गांच्या गुणपत्रिका

ड) संस्था बदलामुळे विद्यापीठ बदल असल्यास विद्यापीठ पात्रता प्रमाणपत्र.

च) शिक्षणात खंड असल्यास ज्या शैक्षणिक संस्थेतील शैक्षणिक खंड आहे त्या संस्थेच्या प्राचार्यांनी दिलेले खंड प्रमाणपत्र (Gap Certificate) किंवा रु.१००/-च्या स्टँप पेपरवर शिक्षणातील खंडाबाबत प्रतिज्ञापत्र.

छ) प्रथम वर्ष किंवा थेट व्दितीय वर्ष प्रवेशाचे ॲलॉटमेंट लेटर (उपलब्ध असल्यास).

ज) संस्था बदल करण्यासाठीचे कारण या पृष्ठर्थ पुरावे

३. संस्था बदलाकरीताच्या अर्जासोबत परिच्छेद क्रमांक २ (क ते ज) नमूद केलेले कागदपत्रासह परिपूर्ण अर्जाचा विचार करण्यात येईल. अपूर्ण अर्ज किंवा आवश्यक प्रमाणपत्र / कागदपत्रांविना सादर केलेले अर्जांबाबत काहीही न कळविता असे अर्ज दप्तरी दाखल तथा नस्तीबध्द करण्यात येतील याची नोद घ्यावी.

४. विद्यार्थ्यांनी सध्या शिक्षण घेत असलेल्या शैक्षणिक संस्थेकडून फक्त ना-हरकत प्रमाणपत्र घ्यावे, लिव्हींग सर्टीफीकेट घेऊ नये, संस्था बदलाचे आदेश पारित झाल्यानंतरच लिव्हींग सर्टीफीकेट घेण्यात यावे.

५. प्रथम / व्दितीय वर्षात एकदा प्रवेश घेतलेला विद्यार्थी त्याच शैक्षणिक वर्षात इतर कोणतीही संस्था बदलून मागण्यास पात्र असणार नाही.

६. विना-अनुदानित संस्थेतील विद्यार्थ्यांना कोणत्याही परिस्थितीत शासकीय, शासन अनुदानित, विद्यापीठ विभाग किंवा विद्यापीठ संचालित शैक्षणिक संस्थेमध्ये संस्था बदल अनुज्ञेय नाही, तथापी शासकीय, शासन अनुदानित, विद्यापीठ विभाग किंवा विद्यापीठ संचालित शैक्षणिक संस्थेतील विद्यार्थ्यांना विना-अनुदानित शैक्षणिक संस्थेत संस्था बदल अनुज्ञेय आहे.

७. विद्यार्थ्यांना, कोणत्याही टप्प्यावर स्वायत्त संस्थांमध्ये बदलून जाता येणार नाही.

८. अधिसंख्य कोटयातील जागे अंतर्गत प्रवेशित विद्यार्थी (Admitted under Supernumerary Quota seats) पाठ्यक्रम किंवा संस्था बदलासाठी पात्र नाहीत.

९. संस्था बदलासाठीच्या प्रक्रियेपूर्वी विद्यापीठाचा किंवा संस्थेचा निकाल घोषित झाला नसेल तर, संबंधित विद्यार्थ्यांचा शाखा बदल, संस्था बदल इ. मागणीचा विचार करण्यात येणार नाही.

१०. संस्था बदल ज्या संस्थेत पाहिजे आहे त्याच संस्थेकडे विद्यार्थ्यांनी परिपूर्ण अर्ज जमा करावयाचा असून या कार्यालयाकडे किंवा सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचेकडे विद्यार्थ्यांनी थेट अर्ज करू नये. या कार्यालयाकडे किंवा सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचेकडे प्राप्त होणा-या थेट अर्जावर कोणतीही कार्यवाही होणार नाही याची कृपया नोंद घेण्यात यावी.

११. संस्था बदलासाठीचा अर्ज जमा केल्यानंतर सदर अर्जावरील पुढील कार्यवाही तथा पाठपुरावा संबंधित संस्थेकडून करण्यात येणार असल्याने विद्यार्थी व पालकांनी या कार्यालयास किंवा सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचेकडे व्यक्तीश: भेट देऊ नये.

१२. विद्यार्थ्यांनी संस्था बदलासाठीच्या विनंती अर्जात त्यांचा ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांक नमूद करावा, जेणेकरून त्यांचे अर्जाच्या अनुषंगाने अधिकची माहिती आवश्यक असल्यास ती तात्काळ उपलब्ध करून घेणे शक्य होईल. तसेच त्यांची विनंती मान्य झाल्यास मान्यतेचे आदेश त्यांना ई-मेल द्वारे पाठविणे शक्य होईल.

१३. पाठ्यक्रम, संस्था व विद्यापीठ स्थलांतरण विद्यार्थ्यांच्या विनंतीनुसार केल्यामुळे होणा-या कोणत्याही शैक्षणिक परिणामास विद्यार्थी स्वत: जबाबदार राहील.

१४. सध्या शिक्षण घेत असलेल्या संस्थेकडून मुळ प्रमाणपत्र घेण्याची जबाबदारी संबंधित विद्यार्थी तथा त्याच्या पालकाची राहील.

१५. संस्था स्थलांतरणामुळे पूर्वीच्या संस्थेतील फी परतावा किंवा अदा करावयाची असल्यास तसेच स्थलांतरणाच्या संस्थेत फी अदा करण्याची जबाबदारी संबंधित विद्यार्थी तथा त्याच्या पालकाची राहील.

१६. एमबीए, एमसीए, पीजीडीएम, एमई/एमटेक, एम.फार्म, एम.आर्च,एम.एचएमसीटी इ. पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमास नियमानुसार संस्था बदल अनुज्ञेय नाही. यास्तव सदर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी संस्था बदलासाठी अर्ज करू नये.

(डॉ.अभय वाघ)
संचालक, तंत्र शिक्षण,म. रा. मुंबई

प्रत : मा. सचिव, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, ८ वा मजला, न्यू एक्सेलसिएर बिल्डींग, ए के नायक मार्ग,फोर्ट, मुंबई ४०० ००१ यांना माहितीसाठी सादर

प्रत : माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित :-

१. सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर
त्यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक त्यांचे कार्यक्षेत्रातील सर्व अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, एचएमसीटी पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थाना अग्रेषित करून संस्थेच्या संकेतस्थळी व सूचना फलकावर प्रसिध्द करण्यास कळविण्यात यावे.

२. प्राचार्य, सर्व अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, एचएमसीटी पदवी महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य.
त्यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक संस्थेच्या संकेतस्थळी व सूचना फलकावर प्रसिध्द करून पुढील उचित कार्यवाही कालमर्यादेत करण्यात यावी.

३. मा. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य (पात्रता शाखा)

४. कार्यासन क्रमांक ३, मुख्य कार्यालय, मुंबई

५. कार्यासन क्रमांक २, निवड नस्तीस.

---

पृष्ठांकन क्र. विकाऔ/शिक्षण/२०२२/2133
दिनांक:- 22 JUL 2022

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये या कार्यालयाच्या अधिपत्याखालील विनाअनुदानित अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र व एचएमसीटी इ. पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे पहिल्या वर्षानंतर पाठयक्रम/पाळी बदल, तसेच पहिल्या, दुस-या व तिस-या वर्षानंतर संस्था बदल करण्याबाबत सोबतच्या परिपत्रकात दिलेल्या सुचनेप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

(उमेश नागदेवे)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत :- या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.